N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): गोंदिया **P.S.**(ठाणे): गोंदिया शहर **Year** (वर्ष): 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0559 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 25/10/2019 22:16 बजे

2. **S.No.** (अ.क्र.) **Acts** (अधिनियम) **Sections** (कलम)

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): शुक्रवार

**Time Period** (कालावधी): पहर 6

**Date From** (दिनांक पासून): 25/10/2019
**Date To** ( दिनांक पर्यंत): 25/10/2019
**Time From** (वेळेपासून): 15:12 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 16:01 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 25/10/2019 **Time** (वेळ): 21:59 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 045 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 25/10/2019 21:59 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 01 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): मसानी चौक माताटोली ,गोंदिया, 441601

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): आकांत वासुदेव हारोडे

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : वासुदेव हारोडे

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | माताटोली, मडी जवळ, ,गोदिया,गोंदिया शहर,गोंदिया,महाराष्ट्र,441601,भारत |
| 2 | स्थायी पता | माताटोली, मडी जवळ, ,गोदिया,गोंदिया शहर,गोंदिया,महाराष्ट्र,441601,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-9373916489

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजकुमार चितुलाल पाचे | | वडील का नाम : चितुलाल पाचे | 1. वसंतनगर, आझाद वार्ड, गोंदिया , गोंदिया ,गोंदिया शहर,गोंदिया,महाराष्ट्र, भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

पंचनामा कार्यवाही केल्यानंतर

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

प्रकरण अशा प्रकारे आहे की, घटना ता.वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी आपल्या लोकसेवक सेवेचा पदाचा दुरुपयोग करुन तक्रारदाराचा सट्टापट्टीच्या धंद्यावर कार्यवाही न करण्याकरिता तक्रारदाराकडे. रु.10,000/-लाच रकमेची मागणी करुन ती लाच रक्कम रु.10,000/- तक्रारदाराकडुन पंचासमक्ष स्विकारल्याने सदर गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. फिर्यादि ला. प्र. वि. गोंदिया दि. 25/10/2019नाव- श्री आकांत वासुदेव हारोडे वय32वर्ष, व्यवसाय हॉटेल, रा. माताटोली, मडी जवळ, गोंदिया, ता.जि. गोंदिया मो. न. 9373916489 मी दिनांक 24/10/2019 रोजी पोलीस निरीक्षक श्री शशिकांत श्रीराम पाटील, ला.प्र.वि. गोंदिया यांचे समक्ष एका लोकसेवकाविरुद्द लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. पोलीस निरीक्षक श्री पाटील यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टंकलिखित करुन त्यांची प्रिंट आउट काढली, त्यावर मी सही केली, मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, गोंदिया येथे येवून तक्रार नोंदवितो की, मी वरील पत्यावर कुटुंबासह राहतो व माझा हॉटेलचा व्यवसाय आहे. मी आपल्या हारोडे नमकिन वाला या हॉटेल मध्ये अंदाजे दोन वर्षापासून अवैध्द रित्या सट्टापट्टी चालविण्याचा धंदा करीत होतो. त्यावेळी स्थानिक गुन्हे शाखा गोंदिया येथे श्री राजू पाचे पोलीस हे माझ्याकडुन रुपये 2000/- मासिक हप्ता घेत होते. परंतु मागील 04 महिन्यापासून माझा सट्टापट्टी चा धंदा बंद असल्याने मी त्यांना पैसे देने बंद केले होते, त्यानंतर मात्र मी ऑक्टोबर 2019 पासुन सट्टापट्टी चा धंदा पुन्हा सुरु केलेला आहे. मी दिनांक 23/10/2019 रोजी सांयकाळी 06.45 वा. सुमारास आपल्या हॉटेल मध्ये हजर असतांना श्री राजू पाचे व श्री विनय शेंडे पोलीस दोन्ही स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया हे माझ्या हॉटेल मध्ये आले, त्यावेळी श्री पाचे पोलीस हे मला म्हणाले की, तुम्ही रुपये 10,000/- द्या. मी तुमच्या सट्टापट्टी च्या धंद्यावर कारवाई करणार नाही. त्यावर मी त्यांना नाईलाजाने ठिक आहे असे म्हटले. श्री राजु पाचे पोलीस स्थानिक गुन्हे शाखा गोंदिया यांनी माझ्या सट्टापट्टी च्या धंद्यावर कारवाई न करण्याकरीता माझ्याकडे मागणी केलेली मासिक हप्ता रुपये 10,000/- लाच रक्कम त्याना देण्याची माझी मुळीच इच्छा नसल्यामुळे मी त्याचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्या करीता स्व:इच्छेने तक्रार देत आहे. त्यांचेशी माझे पुर्व वैमनस्य नाही. माझी तक्रार संगणकावर टंकलिखित करुन तिची प्रिंट आउट काढुन ती वाचुन पाहिली, माझे सांगण्प्रमाणे संगणकावर बरोबर टंकलिखित केलेली आहे. तदनंतर पोलीस निरीक्षक श्री पाटील यांनी दोन शासकीय पंचाना पाचारण करुन त्याची ओळख आमच्याशी करुन दिली. पोलीस निरीक्षक श्री शशिकांत पाटील यांनी दोन्ही पंचाना थोडक्यात हकिकत सांगुन माझी तक्रार पंचाना वाचवयास दिली. पोलीस निरीक्षक श्री पाटील यांचे सुचनेवरुन सदर तक्रार अर्जावर दोन्ही पंचानी स्वाक्षरी केली त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री पाटील यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर त्यांनी वाईस रेकॉर्डर कशाप्रकारे काम करतो. याबाबत आम्हास व पंचास सविस्तर माहिती दिली. तदनंतर पोलीस निरीक्षक श्री पाटील

यांच्या सांगणेवरुन मी सापळा कारवाईत वापरण्यात येणारी लाच रक्कम रुपये 10,000/- त्यांच्या कडे जमा केली. पोलीस निरीक्षक, श्री पाटील यांनी लाच रक्कमेला लावण्यात येणाऱ्या अँथ्रासिन पावडरची वैशिष्ट सांगुन त्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावण्याचे प्रात्याक्षिक आपल्या अधिनस्त कर्मचारी यांच्या हस्ते करुन दाखविले. त्यानंतर अँथ्रासिन पावडर लावलेल्या रुपये 500/- दराचा 20 चलनी नोटा असे एकुण 10,000/- एका लिफाफ्यात ठेवून लिफाफा सिल बंद करुन कार्यालयीन कपाटात ठेवून दिला. पोलीस निरीक्षक श्री पाटील यांनी मला दिनांक 25/10/2019 रोजी वेळी 08.00 वा. ला.प्र.वि. गोंदिया कार्यालयात हजर राहण्याबाबत सुचना दिल्या. या कारवाई बाबतचा सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक, श्री पाटील यांनी पंचनामा क्रमांक 1 मध्ये घेतल्या आहेत. आज दिनांक 25/10/2019 रोजी वेळ 08.00 वा. मी पोलीस निरीक्षक श्री पाटील, यांचे सुचनेनुसार माझ्या कडे असलेल्या खाजगी मोटार सायकलने ला.प्र.वि. गोंदिया कार्यालयात हजर आलो. त्या ठिकाणी पोलीस निरीक्षक श्री पाटील हे दोन्ही पंच व सावळा पथका सोबत हजर होते. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री पाटील यांनी पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानतर पोलीस निरीक्षक श्री पाटील यांनी पुढील कारवाई माझे राहते घरी करावयाचे ठरवून मला पंच क्रमाक 1 केळूत याचे सोबत माझ्या खाजगी मोटार सायकलने माझ्या राहते घर माता टोली, मडी जवळ, गोंदिया येथे जाण्यास रवाना केले. व सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग माझ्या राहते घरी आले. वेळ 09.59 वा. वाईस रेकार्डर सुरु करुन त्यामध्ये पंच क्रमांक 1 व माझ्या आवाजात पडताळणी करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनी मुद्रित करुन वाईस रेकॉर्डर सह मला पंच क्रमांक 1 श्री केळूत यांचे सोबत माझ्या घराला लागुनच असलेला माझ्या मालकीच्या हॉटेल मध्ये रवाना केले. त्यानंतर काहीवेळाने गै.अ. श्री राजु पाचे, पोलीस हवालदार हे माझ्या हॉटेल मध्ये आले. त्याचेशी बोलणी दरम्यान त्यांनी माझ्या सट्टापट्टी च्या धंद्यावर कारवाई न करण्याकरीता माझ्याकडे रुपये 10,000/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी केली. त्यानंतर वेळ 12.54 वा. मी पंच क्रमांक 1 यांच्यासह सापळा पथकाकडे परत आल्यावर वाईस रेकार्डर पंच क्रमांक 1 यांच्या आवाजात बंद करण्यात आला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री शशिकांत पाटील यांनी वाईस रेकार्डर मधील रेकार्ड संभाषण ऐकुन गैर.अ. श्री राजु पाचे, पोलीस हवालदार यांनी माझ्या सट्टापट्टी च्या धंद्यावर कारवाई न करण्याकरीता माझ्या कडे रुपये 10,000/- लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम प्राप्त करण्याच्या प्रयत्न केल्याची खात्री केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री पाटील यांनी आपल्या अधिनस्त कर्मचारी यांच्या हस्ते लाच रक्कम ठेवलेल्या लिफाफ्यातून अँथ्रासिन पावडर लावलेला रुपये 500/- दराच्या 20 चलनी नोटा असे एकुण रुपये 10,000/- पंचासमक्ष काढुन माझ्या फुलपँटच्या समोरील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक पाटील यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर वेळ 15.12 वा. वाईस रेकार्डर सुरु करुन पंच क्रमांक 1 व माझ्या आवाजात सापळा कारवाई करीता जात असल्याचे संभाषण रेकार्ड केले व वाईस रेकार्डर सह मला पंच क्रमांक 1 श्री केळुत यांचे सोबत माझ्या घराला लागुनच असलेल्या माझ्या मालकीच्या हॉटेल मध्ये रवाना केले. पोलीस निरीक्षक श्री पाटील हे पंच क्रमांक 2 व सापळा पथकातील सदस्यासह आमचे मागोमाग येवून माझ्या मालकीच्या हॉटेलच्या आजुबाजुला दबा धरुन बसले. मी पंच क्रमांक 1 यांच्यासह माझ्या मालकीच्या हॉटेल मध्ये गेलो. काहीवेळाने गै.अ. श्री राजु पाचे यांनी आपल्या मोबाईल वरुन माझे मोबाईल वर संपर्क साधुन भैय्या आवू क्या असे बोलले असता, त्यावर मी त्यांना ठिक है। आ जाओ असे म्हटले. त्यानंतर लगेच गै.अ. श्री राजु पाचे हे माझ्या हॉटेल मध्ये आले. त्यानंतर माझ्या हॉटेलला लागुन असलेल्या बाजुच्या गाळ्यामध्ये त्यांना बसविले. त्याठिकाणी श्री राजु पाचे यांचेशी बोलणी दरम्यान त्यांनी माझ्या सट्टापट्टी च्या धंद्यावर कारवाई न करण्याकरीता माझेकडे रुपये 10,000/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी केली. त्यावरुन मी लाच रक्कम रुपये 10,000/- माझ्या फुलपँट चे डाव्या खिश्यातुन डाव्या हाताने काढून गै.अ. श्री राजु पाचे यांना पंचासमक्ष दिले. त्यांनी ती लाच रक्कम रुपये 10,000/- आपले डाव्या हाताने स्विकारुन डाव्या हातात ठेवली. त्यानंतर मी पंच क्रमांक 1 सोबत दर्शनी ठिकाणी येवून सापळा पथकास गै.अ. यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने श्री राजकुमार चितुलाल पाचे, वय 42 वर्षे, पद पोलीस हवालदार ब.न. 384, स्थानिक गुन्हे शाखा, जि. गोंदिया रा. वसंतनगर, आझाद वार्ड, गोंदिया ( वर्ग 3) यांना रंगेहाथ पकडले. त्यानंतर 16.01वा. पंच क्रमांक 1 च्या आवाजात वाईस रेकार्डर बंद करुन पुढील कारवाई करण्यात आली. सदर सापळा कारवाई बाबतचा सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री पाटील यांनी पंचनामा क्रमांक 2 मध्ये घेतल्या आहेत. तरी लोकसेवक श्री. राजकुमार चितुलाल पाचे वय 42 वर्षे, पद पोलीस हवालदार, ब.न.384, स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया जि. गोंदिया रा. वसंतनगर, आझाद वार्ड, गोंदिया (वर्ग 3) यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन माझ्या सट्टापट्टी च्या धंद्यावर कारवाई न करण्याकरीता माझ्या कडे रुपये 10,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम रुपये 10,000/- माझ्याकडुन पंचासमक्ष स्विकारली. म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखित केली असुन ती मला वाचुन दाखविण्यात आली. ती माझ्या सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13. Action** Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): BABAN Maruti AVHAD(I (Inspector)) / PCMH91980 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Amode
25/10/2019

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

F I R प्रत. मुळ प्रत मला मिळाली
Amode
25/10/2019

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची)

**Name** (नाव): BABAN Maruti AVHAD (PSI. Popat Kashid)

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PCMH91980

स्टे.डा.अंमलदार
पोलीस स्टेशन गोंदिया शहर

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)